|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

संलग्नता विभाग

जाक्र.कबचौउमवि/५/३००/२०२५.

दि. ७/१०/२०२५.

**परिपत्रक (अत्यंत महत्त्वाचे)**

**(संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकरीता)**

**प्रति,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा. संचालक यांना...

**विषय** :- Oasis प्रणालीद्वारे महाविद्यालयाची माहिती अद्ययावत करणेकरीता आयोजित करण्यात येत असलेल्या Camp संदर्भात.

**महोदय/महोदया**

विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे संलग्नता विभागाचे कामकाज ऑनलाईन प्रणालीमार्फत सुरू आहे. संबंधित महाविद्यालये/परिसंस्था संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव सादर करताना Academic Information आणि Teachers Information update करून प्रस्ताव भरून विद्यापीठास ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करतात. परंतु विद्यापीठाचे असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचदा भरलेल्या माहितीची खातरजमा न करता अपूर्ण भरलेली/अद्ययावत न केलेली माहिती ऑनलाईन प्रणालीमार्फत Submit करून Send to University करण्यात येते त्यामुळे वेळोवेळी सदरची माहिती पुन:श्च भरणेसाठी अद्ययावत करणेसाठी Academic Information/Proposal Link Unlock करावी लागते त्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होतात. महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे तात्काळ निराकरण करणेसाठी विद्यापीठात Camp आयोजित करण्यात आलेला असून खालीलप्रमाणे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

| अक्रं. | दिनांक व वार | जिल्हा व महाविद्यालये |
|---|---|---|
| १ | दि. १३.१०.२०२५ सोमवार<br>दि.१४.१०.२०२५ मंगळवार | जळगांव शहरातील सर्व महाविद्यालये |
| २ | दि. १५.१०.२०२५ बुधवार | धुळे शहरातील सर्व महाविद्यालये |
| ३ | दि.१६.१०.२०२५ गुरूवार | नंदुरबार शहरातील सर्व महाविद्यालये |
| ४ | दि. २८.१०.२०२५ मंगळवार | जळगांव व भुसावळ तालुक्यातील सर्व महाविद्यालये |
| ५ | दि. २९.१०.२०२५ बुधवार | बोदवड, जामनेर, मुक्ताईनगर, रावेर, यावल तालुक्यातील सर्व महाविद्यालये |
| ६ | दि. ३०.१०.२०२५ गुरूवार | चाळीसगांव, चोपडा तालुक्यातील सर्व महाविद्यालये |
| ७ | दि. ३१.१०.२०२५ शुक्रवार | पाचोरा, एरंडोल,भडगांव, धरणगांव तालुक्यातील सर्व महाविद्यालये |
| ८ | दि. ३.११.२०२५ सोमवार | अमळनेर, पारोळा तालुक्यातील सर्व महाविद्यालये |
| ९ | दि. ४.११.२०२५ मंगळवार | धुळे, साक्री तालुक्यातील सर्व महाविद्यालये |
| १० | दि.६.११.२०२५ गुरूवार | शिरपूर, शिंदखेडा तालुक्यातील सर्व महाविद्यालये |
| ११ | दि. ७.११.२०२५ शुक्रवार | नंदुरबार, अक्कलकुवा, नवापूर तालुक्यातील सर्व महाविद्यालये |
| १२ | दि. ८.११.२०२५ शनिवार | शहादा, धडगांव, तळोदा तालुक्यातील सर्व महाविद्यालये |

तरी आपणास विदीत करण्यात येते की, माहिती अद्ययावत करणेकरीता आपल्या महाविद्यालयाची प्रथम संलग्नता मान्यतापत्र तसेच विस्तारातंर्गत विषय/विद्याशाखा/अतिरिक्त तुकडी/नविन अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेत वाढ करीता मान्यता प्राप्त झालेली आहे, त्या शासन निर्णयाची व विद्यापीठ मान्यतेची प्रत, महाविद्यालयास कायम संलग्नीकरण प्राप्त झालेले असल्यास कायम संलग्नीकरणाची मान्यताप्रत तसेच त्यानंतर विद्यापीठाने वेळोवेळी नविन अभ्यासक्रम/तुकडयांना मान्यता प्रदान केलेली असल्यास त्यांचे शासन निर्णय व विद्यापीठ मान्यतापत्र सोबत आणणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रांच्या आधारे विषय/तुकडयांची पडताळणी करण्यात येईल व याबाबतची खात्री झाल्यानंतरच सदरची माहिती Lock करण्यात येईल. Oasis प्रणालीद्वारे आपल्या महाविद्यालयाची/परिसंस्थेची माहिती आपले प्रतिनिधीमार्फत एकदा अद्ययावत केल्यानंतर सदरची माहिती कायम स्वरूपी Lock करण्यात येईल. तद्नंतर त्यात कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. त्यात नविन विषय/अभ्यासक्रम यांना मान्यता दिलेली असल्यास अथवा विषय/अभ्यासक्रम बंद केलेले असल्यास फक्त तेवढीच माहिती Edit करून Add किंवा Delete करता येईल. त्यामुळे माहिती अपडेट करणेकरीता महाविद्यालय/परिसंस्थातील ज्या कर्मचारी/प्रतिनिधींना सखोल माहिती आहे अशाच कर्मचारी/प्रतिनिधींना समक्ष पाठविणे आवश्यक आहे. आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेत शासनाची मान्यता नसताना जे विषय/अभ्यासक्रम सुरू असतील किंवा अभ्यासक्रम बंद केलेले असतील त्याबाबत आवश्यक अनुषंगिक कागदपत्रांसह विद्यापीठास अवगत करणे आवश्यक आहे व याबाबतची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

तरी संबंधित महाविद्यालयांनी उपरोक्त नमूद केलेल्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करून वर नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार आवश्यक त्या अनुषंगिक कागदपत्रांसह आयोजित Camp मध्ये उपस्थित राहून आपल्या महाविद्यालयाची Academic Information, अभ्यासक्रम, प्रवेशक्षमता इ.तसेच इतर तद्अनुषंगिक माहिती अद्ययावत करून घ्यावी ही विनंती.

कळावे.

आपली विश्वासू

(सविता पी. सोनकांबळे)
उपकुलसचिव(संलग्नता विभाग)